**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक २३ जून २०२५**

**ठळक बातम्या**

1. **संसदेच्या अंदाज समितीच्या कार्यारंभाच्या पंचाहत्तरीनिमित्त मुंबईत विधानभवनात राष्ट्रीय परिषदेला प्रारंभ.**
2. **इराण-इस्रायल संघर्षाच्या पार्श्वभूमीवर कच्च्या तेलाच्या दरात वाढ/ भारताकडे पुरेसा तेलसाठा असल्याचा हरदिपसिंग पुरी यांचा विश्वास.**
3. **राज्य शिक्षण मंडळाच्या नव्या शैक्षणिक वर्षाच्या प्रथम सत्राला विदर्भात आजपासून सुरुवात, विविध पद्धतीने शाळा प्रवेशोत्सव साजरा.**
4. **एमपीएससी परीक्षार्थ्यांसाठी 'केवायसी' प्रक्रिया बंधनकारक.**

---

**अंदाज समिती**

**संसदेच्या अंदाज समितीच्या कार्यारंभाला ७५ वर्षेपूर्ण होत असल्यानिमित्त मुंबईत राष्ट्रीय परिषद सुरू आहे. या परिषदेचा प्रारंभ आज विधानभवनात झाला. याप्रसंगी लोकसभेचे अध्यक्ष ओम बिरला, राज्यसभेचे उपसभापती हरिवंश सिंह, महाराष्ट्र विधानपरिषदेचेसभापती राम शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर,मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. अर्थसंकल्पीय अंदाजांची समीक्षा आणि प्रभावी निगराणीसाठी अंदाज समितीची भूमिका हा या कार्यक्रमाचा मुख्य विषय आहे. या वेळी केलेल्या संबोधनात मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्राकलन समितीचे महत्व विशद केले -**

***(होल्ड बाईट -फडणवीस)***

***डायनामिक तरीके से काम करने वाली अगर कोई कमिटी है तो वो प्राकलन कमिटी है, क्योंकि ये कमिटी लगातार हमारे बजट में जो बजट इस्टीमेट है, उसको किस प्रकार से उसकी मांग की गई क्या वो मांग सही थी क्या उसका खर्चा ठीक से हो रहा है, ये सारी चीजें ये इस्टिमेट कमिटी देखती है। और एक प्रकार से इस पूरी प्रक्रिया के ऊपर अंकुश रखने का काम इस्टिमेट कमेटी के माध्यम से होता है।***

**स्वातंत्र्यानंतरच्या ७५ वर्षांच्या प्रवासात आपल्या लोकशाहीने विविध आव्हानांचा सामना केला असून,ती आता अधिक मजबूत झाली असल्याची भावना लोकसभेचे**

सभापती ओम बिरला यांनी व्यक्त केली. तर लोकशाही राज्यव्यवस्थेत संसद सरकारला नियंत्रणात ठेवण्याचं काम करते आणि हे काम अंदाज समितीच्या माध्यमातून अधिक प्रभावीपणे केलं जातं, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.

-------------------------------------

नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी

नागपुरातील राष्ट्रीय कायदा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीच उद्घाटन भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण आर. गवई यांच्या हस्ते रविवार दिनांक २९ जून रोजी सकाळी १०.३० वाजता होणार आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अन्य मान्यवर यावेळी उपस्थित असतील.

-------------------------------------

डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी

डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या शहीद दिनी आज देश त्यांना श्रद्धांजली वाहत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मुखर्जी यांना श्रद्धांजली वाहिली. आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात मोदी म्हणाले की, डॉक्टर मुखर्जी यांनी देशाची अखंडता अबाधित ठेवण्यासाठी अतुलनीय धैर्य दाखवत प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

-------------------------------------

कच्च्या तेलाच्या किमती

इराण आणि इस्रायलमध्ये अद्याप संघर्ष सुरु आहे. अमेरिकेनं काल इराणवर हल्ला केल्यानंतर इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई यांनी इस्रायलवर हल्ले सुरु ठेवणार असल्याचं म्हटलं आहे. इस्रायलनं मोठी चूक केल्याचं त्यांनी समाजमाध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. इराणच्या संसदेनं फोर्डो,नतांज आणि एस्फहान इथल्या इराणी आण्विक तळ अमेरिकेच्या हवाई हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर जगातला सर्वात महत्त्वाचा तेल आणि वायू वाहतूक मार्ग असलेल्या होर्मुझची सामुद्रधुनी बंद करण्याचा प्रस्ताव एकमतानं मंजूर केला आहे. यामार्गावरची सागरी वाहतूक बंद करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचा अंतिम अधिकार इराणच्या सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा परिषदेकडे आहे. या परिषदेनं अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा केली नसली तरी या निर्णयामुळे जागतिक स्तरावर तेलाची किंमत प्रति बॅरल शंभर डॉलर्सच्या वर जाऊ शकते. दरम्यान, अमेरिकेच्या लष्करी अधिकाऱ्यांनी अत्यंत

सावधगिरीने या भागात लष्करी दल तैनात केलं आहे. दरम्यान, भारताकडे तेलाचा पुरेसा साठा उपलब्ध असून गेल्या दोन आठवड्यातील पश्चिम आशिया भागातल्या भूराजकीय परिस्थितीकडे भारत सरकार बारकाईनं लक्ष ठेवून आहे, असं केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदिपसिंग पुरी यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.भारताने गेल्या काही वर्षांत आपल्या कच्च्या तेल आयाती संदर्भातील पुरवठा साखळीत विविधता आणली आहे आणि आता होर्मुझच्या सामुद्रधुनीतून मोठ्या प्रमाणात पुरवठा होत नाही. तसंच भारतीय तेल विपणन कंपन्यांकडे अनेक आठवडे पुरेल एवढा तेल साठा उपलब्ध आहे.

------------------------------------

शाळा प्रवेश उत्सव

राज्य शिक्षण मंडळाच्या नव्या शैक्षणिक वर्षाच्या प्रथम सत्राला विदर्भात आजपासून सुरुवात झाली. बुलढाणा इथं शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना बैलगाडीतून बसून केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी शाळेत आणलं. शाळेत आलेल्या सर्व विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देत त्यांचं स्वागत केलं. यवतमाळ जिल्ह्यात नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात आज उत्साहात करण्यात आली. शिक्षण विभागाने जिल्हा परिषद, नगरपालिका, खाजगी प्राथमिक, माध्यमिक शाळांमध्ये आज प्रवेशोत्सव घेतला. आणि शाळांमध्ये पहिली घंटा वाजली. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी आसेगाव देवी येथे चार चाकी वाहनातून विद्यार्थ्यांची मिरवणूक काढण्यात आली. गोंदिया जिल्ह्यातही आज पहिली घंटा वाजली. जिल्ह्यातील जिल्हा परिषद, नगरपालिका, अनुदानित आणि विनाअनुदानित एक हजार 38 शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी नव्या उत्साहानं हजेरी लावली. पहिलं पाऊल' उपक्रमांतर्गत नव्या विद्यार्थ्यांचे ठसे उतरवण्यात आले, त्यांना वह्या, पुस्तके आणि गणवेशाचे वाटप करण्यात आलं. शैक्षणिक वर्षाच्या 2025-26 च्या प्रथम सत्राला प्रारंभ झाला असून राज्य शासनाच्या आदेशानुसार वाशिम जिल्ह्यात शाळेच्या पहिल्याच दिवशी शाळा प्रवेशोत्सवाच्या वेळी नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या ७७४ शाळा, ३६६ खासगी शाळा, ३२६ विनाअनुदानित शाळा उघडल्या आहेत, अशी माहिती शिक्षण अधिकारी आकाश आहळे यांनी दिली. चंद्रपूर तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक आदर्श शाळा चिंचाळा इथं आज शाळा प्रवेशोत्सव अत्यंत उत्साहात पार पडला. यावेळी आमदार सुधाकर अडबाले यांनी विद्यार्थ्यांसाठी खास सजवलेली चारचाकी पाठवली.

------------------------------------

**११ वर्ष अल्पसंख्याक विकास**

**सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण या तत्त्वांमुळं, भारतानं गेल्या दशकात, उल्लेखनीय परिवर्तन अनुभवलं आहे. आकाशवाणी आपल्या श्रोत्यांसाठी, गेल्या अकरा वर्षात, प्रमुख क्षेत्रांमधील सरकारच्या प्रयत्नांवर एक विशेष लेख-मालिका सादर करत आहे. त्यात आज, अल्पसंख्यांक विकासात केलेल्या कामगिरीचा आढावा ऐकुया....**

***(होल्ड बाईट)***

***गेल्या दशकात, शिक्षण, आर्थिक सक्षमीकरण आणि पायाभूत सुविधा विकास या क्षेत्रात लक्ष्यित उपक्रमांद्वारे सरकारने अल्पसंख्याक समुदायांच्या उन्नतीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण प्रगती केली आहे. एकट्या प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रमाने १८ हजार ४०० कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या प्रकल्पांना मंजुरी दिली. दरम्यान, राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास आणि वित्त महामंडळाने १.७४ लाखांहून अधिक लाभार्थ्यांना ७५२ कोटी रुपयांहून अधिक कर्जे वितरित केली, ज्यामुळे मागासवर्गीयांना सवलतीच्या दरात कर्जे देण्यात आली. हज सुविधा ॲप आणि हज स्वयंसेवकांसाठी समर्पित प्रशिक्षण कार्यक्रमांनी तीर्थयात्रेचा अनुभव समृद्ध केला आहे. पारदर्शकता आणि प्रशासन मजबूत करण्यासाठी, ऐतिहासिक वक्फ सुधारणा कायदा, २०२५ लागू करण्यात आला, त्यानंतर UMID पोर्टल सुरू करण्यात आला, ज्यामुळे वक्फ मालमत्तेसाठी डिजिटल व्यवस्थापनाचे एक नवीन युग सुरू झाले.याव्यतिरिक्त, बौद्ध विकास योजना, जियो पारसी सारख्या इतर योजनांनी विविध समुदायांच्या गरजा पूर्ण केल्या आहेत.समर्पित योजना, शिष्यवृत्ती, डिजिटल सुधारणा आणि वारसा जतन याद्वारे सरकार अर्थपूर्ण सक्षमीकरण आणि कायमस्वरूपी समावेशनाला चालना देत आहे. समावेशन हे केवळ एक धोरण नाही तर ते एक वचन आहे.***

---

**महाराष्ट्र लोकसेवा**

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अर्थात एमपीएससीच्या ऑनलाइन अर्ज प्रणालीत कोणताही अर्ज करण्यापूर्वी उमेदवारांना 'केवायसी' प्रक्रिया पूर्ण करणे सक्तीचे करण्यात आले आहे, अशी माहिती एमपीएससीने दिली आहे. उमेदवारांना पुढील चारपैकी कोणत्याही एका पद्धतीने ओळख पडताळणी (केवायसी) करावी लागणार आहे: 1. आधार ऑनलाइन ई-केवायसी, 2. आधार ऑफलाइन पेपरलेस डिजिटल केवायसी, 3. आधार ऑफलाइन पेपर आधारित केवायसी, 4. नॉन-आधार ऑफलाइन केवायसी या चार पद्धतीने ओळख पडताळणी (केवायसी) करता**

येणार आहे. अर्ज करण्याआधीच ही केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक असेल. याशिवाय, एकदाच नोंदणी करताना उमेदवाराने आपला मोबाईल नंबर आणि ई-मेल आयडी प्रणालीत नोंदवणेही आवश्यक आहे. जर उमेदवाराने आधार आधारित पडताळणी निवडली, तर आधार क्रमांकाशी संलग्न मोबाईल नंबर असणे आवश्यक आहे.

---------------------------------------

आदिवासी फासे पारधी

महाराष्ट्र राज्यातल्या आदिवासी फासे पारधी समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी येत्या 25 आणि 26 जून रोजी नागपूरात सुनावणीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी नागपूरातील रवि भवन येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

---------------------------------------

योग दिन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापिठातील समाजशास्त्र विभाग आणि मराठी विभागाच्या संयुक्त विद्यमानाने 'जागतिक योग दिन' साजरा करण्यात आला.

---------------------------------------

शेयर बाजार

पश्चिम आशियातल्या वाढत्या तणावामुळे आज भारतीय शेअर बाजारात घसरण दिसून आली. आयटी आणि ऑटो क्षेत्रात विक्री झाल्याचे थेट परिणाम निर्देशांकांवर झाले. अमेरिकेने इराणच्या आण्विक तळांवर केलेल्या हल्ल्यांनंतर ही घसरण झाली आहे.

---------------------------------------

ललित उपाध्याय

भारतासाठी हॉकीमध्ये दोनवेळा ऑलिंपिक पदक जिंकणारा ललित उपाध्याय याने आंतरराष्ट्रीय हॉकीमधून निवृत्तीची घोषणा केली आहे.

---------------------------------------